स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९५३

...र लोकमान्य

बाळ गंगाधर टिळक

यांचा

# पोवाडा.



REFBK-0019514
REFBK-0019514

...लेखक,

...मित्र राजकोट.

...मत ४ आणे.

(सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन)

# राष्ट्रसूत्रधार लोकमान्य
# बाळ गंगाधर टिळक
## यांचा
# पोवाडा.

REFBK-0019514

( १ )

नमो नमस्ते, सहस्रमूर्ते, जनतात्मन् भगवन् ॥
स्वातंत्र्य-श्री-मंडन, दुर्जन-दंडन विमलात्मन् ॥
दिव्यगुणालय, भव्य कार्यकर, पूज्य लोकमान्य ॥
श्री टिळकांचा हा 'पोवाडा' ऐकुनि व्हा धन्य ॥
परम पवित्रें, संतचारित्रें, ऐकुनियां धावें ॥
परवशतेचा नाश कराया सज्ज तुह्मीं व्हावें ॥
स्वातंत्र्याच्या वीरमणींनों, देवी रमणींनों ॥
बलवंताच्या यशोगायनीं, या या सर्वांनों ॥
गर्व हराया ऐश्वर्याचा, अनार्य मत्तांचा ॥
कातरतेतें नष्ट कराया अवतार तयांचा ॥
महाराष्ट्रभूतिलका करुनी नम्र वंदनाला ॥
जीवधरानों तन्नामाचा जय मंगल बोला ॥

॥ चाल ॥ जय लोकमान्य टिळकांचा ॥
राष्ट्र देवाचा । धर्मवीराचा ॥
जय हिंद देविचा बोला ॥
जय स्वातंत्र्याचा बोला ॥ जय सतत्त्वांचा बोला ॥
बोला वंदेमातरं, वदा श्रीशिवजय भावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥

( २ )

कलि-प्रभावें, ऐश्वर्यमदें, दुर्दैवेंहि वदा ॥
महाराष्ट्र-स्वातंत्र्य नष्टलें, सर्वैश्वर्य तदा ॥
तेव्हां पासुनि तमोव्याप्त भू दुर्गुणगृह बनली ॥
परवशतेनें महत्त्व-आशा मरोनियां गेली ॥
अर्ध शतकवरि गुलामगिरिच्या नरकीं खडबडले ॥
स्वातंत्र्यप्रिय वीर नंतरीं प्रगट जगीं झाले ॥
परवशतेचा तिरस्कार जन-रोमरोमिं भरला ॥
अठराशें सत्तावन सालीं स्फोट होइ पहिला ॥
स्वातंत्र्याचें युद्ध झुंजलें वरुषें तीन पुरीं ॥
अखिल विश्व दुमदुमुनी गेलें दिव्य यज्ञनिकरीं ॥
॥ चाल ॥ या ऐशा संस्कारांत ॥
दूर प्रांतांत ॥ रत्नागिरि त्यांत ॥
सिंहाचा छावा एक ॥
“ बाळ ” हें वदति ज्या लोक ॥
गंगाधरसुत तो टिळक ॥

रांगत होता, दबा जणूं धरी, स्वातंत्र्याभावें ॥
सादर सुंदर, वीरगायनीं अवधाना द्यावें ॥

( ३ )

सामर्थ्यावर, समृद्धीवर, शान्तीवर घाला ॥
परावलंबनीं आला त्यानें स्वत्वनाश केला !
दुर्बल आह्मी, नालायक अह्मि, गुलामगिरि बरवी ॥
अधर्मवृत्ती अशी प्रबळली, मूर्छित हो उर्वी ॥
आंग्ल जनांचें सर्वचि उत्तम, अमुचें त्याज्य असे ॥
अंधानुकरण बने धर्म मग, सत्या कोण पुसे ॥
अधःपतन हें सहस्रमुख हो, भूमि गाय झाली ॥
श्री विष्णूतें उद्धारार्थ प्रार्थित नत झाली ॥

चाल ॥ श्री विष्णुशास्त्री आले ॥
सांवरुनि धरिलें ॥
शांत हो वदले ॥
लेखनीं घातला बांध ॥
क्लैब्याचे तोडुनि बंध ॥
अवनति ती केली बंद ॥

स्वावलंबनीं रत नर जो जो सुख तो तो पावे ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥

( ४ )

दंत तुटे जणुं, वेदाश्रय तो, यज्ञ " वराहाचा " ॥
विष्णु पावला अस्त, उडाला हा ! हा ! दुःखाचा ॥
धरा लागली पुन्हां खचाया, पारतंत्र्यपापें ॥
" नरकेसरि " धांवला " मराठा " अवनति ती थोपे ।

नाम 'बाळ' परि थोर कीर्ति कारि स्वार्थत्यागानें ॥
एका हस्तें अभय जना दे दुज्या लढेंन ह्मणे ॥
परानुकरणीं वृत्ति गुंतल्या त्यांत अंजन दे ॥
आत्मबलाश्रय, परवशताक्षय, अक्षय तत्त्व वदे ॥
चाल ॥ उसळला देश निजकार्या ॥
धन्य त्या आर्या ॥
सुर शिरोधार्या ॥
तच्चरणा नम्रचि व्हावें ॥
निज सकल त्यास अर्पावें ॥
तद्वचनीं विश्वासावें ॥
निश्चय झाला जनांत तेंव्हां अनुयायी व्हावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥

( ५ )

पाहुनि ऐसा तेजोभास्कर अधिकारी भ्याले ॥
सत्ताहोलीमाजि बसोनी कुजबुज मग चाले ॥
तयांस मिळती नीचवृत्ति जन आमुचेच बंधु ॥
खलबत करिती बुझवायातें धर्मधैर्यसिंधु ॥
महाराष्ट्रसौभाग्य शिवाजी-वंशजासि छळिती ॥
करवीरस्थित राजालागीं वेडा ठरवीती ॥
पाहुनि हा अन्याय खवळला, केसरि घोष करी ॥
छळता कां रे, दुर्बल पाहुनि पंकगतासि वरी ॥
चाल ॥ जन जागृत व्हा रे सारे ॥
मानहत कां रे ॥

क्लीब बनलां रे ॥
गाजवा स्वाधिकारातें ॥
रक्षावें शिववंशातें ॥
रक्षावें नयनीतीतें ॥
इतर जगीं नर, तुह्मीं नसां खर, लवकरि उमजावें ॥
सादर सुंदर, वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( ६ )

अधमा हातीं जातां सत्ता, सत्यातें मारी ॥
सत्याघातें परिवर्धित हो सुजनमनोहारी ॥
सत्य वदे केसरी परी तो एकाकी पडला ॥
आगरकरसमवेत डोंगरीमाजि तया नेला ॥
इच्छा दाविती मूक रहावें स्वार्थत्यागानें ॥
स्वयंप्रकाशित सूर्य झाकितां हंसती सूज्ञमनें ॥
टिळक बाळ बंदींत टाकिला जन जागृत झाला ॥
अनुयायीगण वर्धित झाला, निश्चय कारिति भला ॥
जें जें आह्मां हितकर हो, तें दुःखद सरकारा ॥
जनपदहितकर लोक नावडे, ने कारागारा ॥
चाल ॥ विश्वास उडे बहुतांचा ॥
न्यायनीतीचा ॥
उच्चवृत्तीचा ॥
स्वार्थि हे असति अधिकारी ॥
बनतील आमुचे वैरी ॥
सत्तामद त्यांतें भारी ॥
असंतुष्टता शिरे हृदंतरीं बिश्वासाभावें ॥

सादर सुंदर, वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( ७ )

सत्ताबल करि शरीरबंदी, मन परि उंच उडे ॥
अनंत काला उलंघोनी वेदामाजि पडे ॥
मनुष्यजातीमूलोत्पत्ती काढी शोधोनी ॥
एक क्षणही सेवेविण तो घालवी न मानी ॥
पवित्र झालें कारागृह श्री टिळकांच्या वासें ॥
देशभक्तिचा प्रवेश होई तेथें मज भासे ॥
तेव्हांपासुनि तरुणमनांतें भीति न लव उरली ॥
अभिमानानें तुरुंगशाला प्रियतम त्यां झाली ॥
परवश असलें रम्योद्यानहि तुरुंगशाला हो ॥
कारागृहिं, परि स्वतंत्र असतां, घनानंद लाहो ॥
॥ चाल ॥ जन-मंगल कार्य जयातें ॥
तें न मन भीतें॥
घोर शिक्षेतें ॥
परि द्विगुणित उत्साहानें ॥
रंगतें देश-भक्तीनें ॥
भय भस्म होत तेजानें ॥
पुनश्च हरिःॐवदतां सुटतां, बल खलगण भ्यावे ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( ८ )

गुलामगिरिचे सहचारी जे दारिद्र्य दुकाळ ॥

(स्थळ. प्रत)

प्लेगाचा त्यांतूनि उद्भवे अवतरला काळ ॥
अननुभवी जन 'गांठ' देखुनी घाबरले वदले ॥
प्रळय पातला, देव कोपला, सोडवि कोण वरें ? ॥
तशांत कोणी अधिकाऱ्यांनीं सक्ती चालविली ॥
गोरे सैनिक घरांत घुसवुनि जनता चिडवीली ॥
अति प्रसंगें असह्य दुःखें कांहीं तरुणमनें ॥
अति-संतापीं सज्ज जहालीं वदति सूड घेणें ॥
मोठे मोठे सारे खोटे, अरण्यांत पळती ॥
नरशार्दुल हा धीर वीर ज्या क्षणहि न विश्रांती ॥
॥ चाल ॥ रुग्णालय निजगृह केलें ॥
लोक गांजले ॥ आपुले गणिले ॥
मृत्यु आणि सत्ताधारी ॥
उभयतांस झाला भारी ॥
आदरें लोक आभारी ॥
समाजसेवा हीच खरी हें यांतुनि समजावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( ९ )

सत्तामद बुद्धीस भ्रष्टवी विवेकबल गेलें ॥
क्रोधावेशें तरुणद्वयानें दोन खून केले ॥
आघाताच्या प्रत्याघातें चमकलीच जनता ॥
काय जहालें, कसें जहालें, घाबरुनी जातां ॥
धीर तया दे, सत्य तें वदे स्थितप्रज्ञ बाळ॥
दुर्बुद्धी परि तयास ह्मणती ' हा अमुचा काळ ' ॥

टिळकें केला घोष ' होतसे जुलूम प्लेगांत ' ॥
तरुणांच्या हस्तांतिल पिस्तुल तोंचि घोष करित ॥
विघ्नहराचें करवी पूजन शिवोत्सवास करी ॥
चेतवि तरुणां बंड कराया आह्मा मानि अरी ॥
चाल ॥ तरि आतां बघतां काय ॥
हाचि सदुपाय ॥
केसरीराय ॥
त्या कारागारीं कोंडा ॥
द्या शरीरास बहु दंडा ॥
तत् शांतीलागीं खंडा ॥
यरवड्याचें, साबरमतिचें शिक्षण त्या द्यावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( १० )

अनला कोंडुनि ज्वाला त्याच्या बुझतिल कां सांगा ॥
अतुलबलानें भस्म करिल तो शत्रूच्या आंगा ॥
गुरु स्वयें जो शिकवी लोकां धैर्याचे पाठ ॥
विमलमतीतें साभ्रमतीचें शिक्षण कां नीट ॥
चिनूभाई कुणि धनरक्षक ते भेटीला गेले ॥
आव आणिती धूर्तपणाचा वदती या बोलें ॥
" कशास कष्टा व्यर्थ भोगितां टिळकभाइ येथ ॥
सत्ताधारी वदती तें तें सत्य होत जाते " ॥

" भट्या दारीं तुह्मी ठेविला झाला शिरजोर ॥
वदे तुह्मांतें सोडा गृह तरि ठरतां का चोर ॥
नोकर झाले धनी आम्हुचे हेंच सत्य कळतें ॥
अनुभव आणिन, आत्मबली मी अर्पिन सत्यार्थें ॥
"राहुनि त्यांच्या कृपापाखरीं धन दौलत मिळवा ॥
मनींच ठेवा जें करणें, मग करोनियां दावा" ॥
गुलामगिरिच्या वमना मानी पवित्र तो नीच ॥
मुखावलोकन करितां जावें रौरव नरकींच ॥
॥ चाल ॥ स्वातंत्र्य हेंचि धन माझें ॥
देइ मज ओझें ॥ दास्य नच साजे ॥
प्रभुकृपा अम्हां रक्षीत ॥
प्रभुसत्ता आह्मां सत्य ॥
धर्म एक अम्हुचा मित्र ॥
चुंबन घेण्या त्या लत्तेचें मारित जी, जावें " ॥
सादर सुंदर वीरगायनीं, अवधाना द्यावें ॥ धृ ॥०

( ११ )

कारागृह तें देवालय हो शुद्ध विचारानें ॥
पवित्रतेनें, देशभक्तिनें, संतच्छलनानें ॥
स्वातंत्र्याच्या पवित्र काजा मानस जें झिजलें ॥
विश्रांती त्या कारागारीं, विचार नव स्फुरले ॥
तयेच वेळीं जगीं पसरलें यश विद्वत्तेचें ॥
मॅक्समूलरा वेड लागलें दर्शनिं टिळकांचे ॥

हाय ! परी तो राजद्रोही ठरोनियां भूत ॥
बंदी पडला, बंदित झाला विचार सृष्टींत ॥
वेदाचें निजगूढ प्रकटे ज्याचे हृदयांत ॥
खल-तस्करसमवेत कोंडिला पडलें श्रवणांत ॥
॥ चाल ॥ राणसि लिही तो पत्र ॥
दुष्ट हें कृत्य ॥
भारतीं होत ॥
टिळकांस मुक्त तुह्मि करणें ॥
तद्वचा निजशिरीं धरणें ॥
तो बाळ असें नच वदणें ॥
विद्वत्तेचा आत्मा केवळ नत त्यांतें व्हावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं, अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( १२ )

संवत्सरभरि बंद पडे जरि टिळक-गिरा-धारा ॥
विश्रांतीनें द्विगुणित आलें तेज तया वीरा ॥
धन्य तयाचें जनन जनपदी प्रियतम अर्पीती ॥
संकटमेरू पाहुनि पडतां लीलेनें हंसती ॥
छलबल भारी, बहु उपकारी वाटे ज्या जीवा ॥
तोचि गणावा संतदेव तच्चरण पुण्यठेवा ॥
ताजें खावुनि अन्न जगतिं जरि काकासम कोणी ॥
श्रेष्ठ मानिती धिग् धिग् जीवन लांछन नरयोनीं ॥
नसां-नसांतुनि देशभक्तिचा प्रवाह जरि वाहे ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ... क्रमांक ५५२

तीर्थरूप ती काया, इतरां प्रेतरूप होये ॥
जरि मरणें ध्रुव मानवजीवा वीरासम मरणें ॥
श्वानासम कीं डुकरांसम का योग्य तुह्मां मरणें ॥
चाल ॥ स्वातंत्र्यसमर हें पर्व ॥
निधन तिथ शर्व ॥
तयामधिं गर्व ॥
स्वार्थाचें सरण रचावें ॥
त्यागाग्नी मग भडकावे ॥
सुर-मुनिगण सन्निध यावे ॥
जनहृदयाच्या विमानांत मग प्रमुदित डोलावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं, अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( १३ )

सत्ताधारी लत्तेखालीं जनास चिरडाया ॥
जो जो करिती यत्न तयांतें टिळक करी वांया ॥
वार करावा सत्ताशस्त्रें धैर्यास्त्रें तोडी ॥
मोडी त्यांची शांति सर्वदा, लेखनिनें झोडी ॥
अपजय झाला, शत्रार्क्षीं मग कुटिल कृत्य केलें ॥
अनुचित मार्गें हल्ला करिती शीला दुखवीलें ॥
वदती ताई महाराज मज टिळकें फसवीलें ॥
दत्तक देवुनि जगन्नाथ मम स्वातंत्र्या हरिलें ॥
अधिकाऱ्यांनीं हे भलभलते बोलविले बोल ॥
बळवंतें परि दीर्घप्रयत्नीं केले ते फोल ॥
चोविस वरुषें पुरा झगडला वीर असामान्य ॥

बाणादपि, शापादपि ब्राह्मण, धन्य लोकमान्य ॥

॥ चाल ॥ चंदावरकर बडबडले ॥
शेवटीं रडले । अधोमुख झाले ॥
धनलोभें निजजन छळिला ॥
राष्ट्राचा घात जहाला ॥
तद्देहा अति कष्टविला ॥

आप आपणां वैरी झाला, कुणासि दोषावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं, अवधाना द्यावें ॥

( १४ )

वङ्गभूमिचीं शकलें केलीं जबर जखम झाली ॥
तरुण मनें बेफाम बनोनी विकारवश झालीं ॥
अति संतप्त बुद्धि जहाली दडपशाहि त्यांत ॥
स्फोटक दों द्रव्यांचा संगम बॉम्ब जन्म घेत ॥
बळी तयांतें चुकुनी पडल्या दोन आंग्ल बाला ॥
अधिकाऱ्यांनीं खुदिरामाला फांशीं लटकाविला ॥
इकडे दादाभाई वदती ' स्वराज्य ' हाच भला ॥
उपाय टळण्या दुःस्थिति अपुली अनुभव मज आला ॥
जनता सारी अस्थिर झाली संघटना नच हो ॥
अधिकाऱ्यांची भीती बसली भाषण बंदी हो ॥
' शांतं पापं ' मंत्र सर्वही मवाळ जन जपती ॥
रु ।प्रिय जरि तरि पथ्य वदाया कोणीहि न झटती॥

॥ चाल ॥ तों बुद्धियोग अवतरला ॥
वदत रे चला ॥
अढळ पथ भला ॥
चौसूत्रीं धर्मा वदला ॥
जन अनुयायी त्या झाला ॥
प्रगतीचा गाडा सरला ॥
बुद्धिभेद, भीरुता पळाली, टिळकांच्या नांवें ॥
सादर सुंदर वीरगायनीं, अवधाना द्यावें ॥

( १५ )

व्रत स्वदेशी बहिष्कारयुत शिक्षण राष्ट्रीय ॥
स्वराज्य व्हावें चतुःसूत्रि या मुक्ति होय स्वीय ॥
महामंत्र हा जना शिकविला, जागृत जन केला ॥
प्राप्य वरातें ग्रहण कराया निश्चितमत झाला ॥
कोणी वदती, मवाळ बनती, " कार्यविघातक हो ॥
अशांत जनता करितां तुह्मां काय पुण्यलाहो ? ॥
कार्य विघातक तुमचें सारें राष्ट्रहानि करितां॥
कार्य विधायक करा कांहिं तरि सावध व्हा आतां " ॥
खडका फोडित नदी खळाळे काय विघातक ती ॥
घाट बांधितां सुंदर अनुपम गंगा तिज वदती ॥
आत्मबोध देवुनी प्रगटवी चैतन्यज्वाला ॥
चतुस्त्रा वेदी निर्मोनी पवित्र करिति जला ॥
तयास ह्मणतां कार्य विघातक नच करितां कांहीं ॥

दर्दुर दुरदुर वदे तयातें सिंह डरत नाहीं ॥
चाल ॥ स्वातंत्र्यसौख्य मिळवाया ॥
विमल जन व्हाया ॥
दैन्य नाशाया ॥
संतुष्ट वृत्ति नच व्हावी ॥
मृत शांती नच पसरावी ॥
उपदेशा जो या दावी ॥
तळमळ हृदयीं पारतंत्रिं मधु अन्न न वाटावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥

( १६ )

अंगचोर आणि कार्यनिष्ठ कां एक होति सांगा ॥
कर्तव्याश्रय करा वदे कुणि तरि करिती दंगा ॥
अहंमन्यते, सहनशीलता परगुणिं होईना ॥
राष्ट्र सभा सुरतेसि मोडली, यश परि टिळकांना ॥
सरकारा आनंद जाहला दुमत जनीं झालें ॥
" फोडा मग झोडा " या सूत्रें, कपटा चालविलें ॥
इकडे करितो कार्यरत सदा, जनजागृति कार्य ॥
महाराष्ट्र- भू धन्य जयामधिं चमकत हा आर्य ॥
मद्य-पानबंदीस्तव करितो जनांस उपदेश ॥
क्षणांत दुर्बल सबळ बनोनी अनुसरती त्यास ॥
दुर्गुण जनिंचे विलया जातिल, जागृति येईल ॥
अद्वैतानें जनता सारी उदयोन्मुख करिल ॥

भीती पडली अधिकाऱ्यांतें हितकर्ते अमुचे ॥
मद्यपान-बंदीस करिति मग बंदी तें साचे ॥
॥ चाल ॥ लोकमान्य ते पकडीले ॥
तयांसी वदले ॥ पाप तुह्मिं केलें ॥
राजद्रोह बहु बहु केला ॥
" बाँबच्या रहस्या " वदलां ॥
" दुर्दैव आमुचें " वदलां ॥
पाश टाकिला, सिंह पकडिला, तद्यश ऐकावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ ध्रु० ॥

( १७ )

महाराष्ट्राचा प्राण बहिश्चर झडपुनियां नेला ॥
जनगण सारा स्तिमित जाहला उत्साहचि मेला ॥
देश-वीर हा तयापुढें ये गुलाम सरदार ॥
" जोशी " पंडित संस्कृतज्ञानी भरला दरबार ॥
उदार दावर, धनलोभास्तव, निजजनछलनाला ॥
न्यायासनपदिं उंच वसे तरि श्रेष्ठ न तो झाला ॥
राष्ट्रविरोधी अनेक असती वीर असामान्य ॥
एकाकि झुंजला धन्य हो, धन्य लोकमान्य ॥
संस्कृत पंडित "तेजस् " शब्दीं खंडितमत झाला ॥
देशद्रोही एका घावें छिन्न भिन्न केला ॥
बुद्धिबलानें, स्मृतिज्ञानानें, भाषणशैलीनें ॥
दास्यत्वाचें श्वान पराजित केलें टिळकानें ॥

षड्दिनावधी भाषण केलें जगता दीपवीलें ॥
षड्दर्शनिं कीं राजकारणा जनते शिकवीलें ॥
कीं षड्दर्शनमंथन केलें षड्दिवसांमाजी ॥
न्यायदेवता सुकूं लागली टिळकांच्या काजीं ॥
कुटिलकृतीतें सूर्यतेज तें होईना सहन ॥
काळ्या रात्रीं काळ्या कृत्या येई अवसान ॥
षड्वर्षांची हद्दपारिची शिक्षा टिळकांतें ॥
वदतां गर्जिन्नला केसरी, ऐका वचनातें ॥
चाल ॥ न्यायानें मी निर्दोषी ॥
ईश्वरापाशिं ॥
तुह्मां जो शासी ॥
मम राष्ट्राचें कल्याण ॥
मम भोगें वाढे जाण ॥
स्वातंत्र्य हेंच परिपूर्ण ॥
न्यायासन डळमळे तेधवां भूमी कंपावे ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( १८ )

रात्रीं अवचित फसवुनि जनता तत्पाणा धरिलें ॥
हतबल जनमन अति संतापें करपुनियां गेलें ॥
शिक्षा सांगुनि दावर आला निज-गेहीं परत ॥
कर्म न सोडी कर्त्याला कधिं निश्चित हें सत्य ॥
आप्तबंधुनां, देशबंधुनां कृत्य न हें रुचलें ॥

अनधिकारि ते, तरीहि केवळ मनांत जळफळले ॥
दंगा केला मजूर लोकीं अज्ञानी ह्मणुनी ॥
अखिल देश कंपितस्वन झाला रडला ढळढळुनी ॥
मंडालेच्या किल्ल्यामाजीं नेलें टिळकांना ॥
नव्हे गुहेमधिं मंत्रद्रष्टा तप करि-तो जाणा ॥
चाल ॥ तत्वज्ञ तेथ तात्काळ ॥
रहस्या खोल ।
हरीचे बोल ॥
श्री गीतारहस्य वदला ॥
कर्मयोग प्रतिपादीला ॥
जनतात्मा तुष्ट जहाला ॥
लोकमान्य मग आचार्य अशी नव पदवी पावे ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( १९ )

कर्मयोग आचरी स्वयें मग शिकवी जगताला ॥
संसारीं निष्काम करावें तुह्मि निजकार्याला ॥
कर्म न बंधन, तत्फल इच्छा जीवा बंधन हो ॥
कराल जें जें निष्कामत्वें, ईशपदार्पण हो ॥
इथें अभ्युदय मग निःश्रेयस परलोकीं पावे ॥
तरि संसारीं लोकसंग्रहास्तव व्यवहारावें ॥
दिव्य असा संदेश ईश्वरीं भारतजनतेला ॥
देतां, क्रांती विचार प्रांतीं जन जागृत झाला ॥
स्वराज्याविणें मोक्ष नसे हें तत्व कळों आलें ॥

वराज्यस्फूर्ती, श्यामलमूर्ती, जनहृदयीं डोले ॥
याच अवसरीं युरोपखंडीं घोर युद्ध झालें ॥
इंग्लंडानें जर्मनीवरी युद्ध पुकारीलें ॥
हिंद पुत्र ते फ्रेंच रणावरी परक्यांस्तव लढले ॥
रक्तसिंचनें पॅरिस त्यांच्या ग्रहणमुक्त झालें ॥
चाल ॥ जें संकट साम्राज्याचें
पर्व तें आमुचें ॥
साधणें साचें ॥
बादशाह वचनाधारें ॥
टिळकांनीं जाहिर केलें
अधिकारी परि घाबरले ॥
एकत्रित आपुलें बल करा, साह्य वदाति व्हावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( २० )

राष्ट्रसभांतरीं पुन्हां प्रवेशे कार्य कर भक्ति ॥
स्वराज्यसंघा स्थापन केलें, दिव्य देशभक्ति ॥
स्वराज्यमंत्रें हतबल जनता गतभय मग झाली ॥
समता व्हावी साम्राज्यांतरिं निर्भय वच वदली ॥
संकटकाळीं आत्म-हितास्तव कांहीं देतील ॥
सरे गरज मग मरे वैद्य तरि दहन न करतील ॥
दूरदृष्टि हा असामान्य नर वदला उपदेश ॥
षष्टि वर्ष वय होय तयातें, प्रेमपूर्ण देश ॥
लक्ष मुद्रिका अर्पिति त्या कीं, विश्रांती घ्यावी ॥

ग्रंथ संग्रहालय

वीर विरागी लाथ मारिली कर्ममर्म दावी ॥
तेव्हां पासुनि जनकासम हा विदेहि जन-जनक ॥
पूर्ण जहाला निज कर्तृत्वें तत् पद सुख-जनक ॥
॥ चाल ॥ परि त्याचि समारंभांत ॥
द्विष्ट मोदांत ॥
गरळ टाकीत ॥
अधिकारी टिळकां छळिती ॥
निज द्वेष बुद्धि प्रगटविती ॥
जामीन तुह्मी द्या वदती ॥
राजद्रोही तुह्मीं बोललां, कां नच बांधावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ धृ० ॥

( २१ )

रुपये लक्ष न लक्ष जनानें तत्पादिं अर्पिले ॥
वृद्धत्वानें विसरुनि गेले द्विगुणित बल आलें ॥
अपयश आलें छळकां, ठरले सनदशीर बोल ॥
निज कष्टानें जनभाग्योदय आणियला जवळ ॥
टिळकराज सावधान गर्जे बोले न फसावें ॥
लखनौ तें सर्वां उपदेशी लोभी न बनावें ॥
हिंदु मुसलमिन् समेट केला, भेदवादि रडला ॥
“ फोडा मग झोडा ” हा फासा टिळकें तोडियला ॥
मवाळ परि ते उदार घेऊन नाममात्र बनले ॥
देशहिताहुनि स्वहित तयांतें अधिक श्रेष्ठ झालें ॥

अभिमानाची, निजनामाची, लोकीं प्राणाची ॥
देशास्तव करुनियां प्रसंगीं, मरुनि कीर्ति साची ॥
ह्या तत्वाचा सूर्य तपे श्री टिळक-देव जेथ ॥
स्वार्थी, लोभी, दंभी, दर्पी, तत्स्थलिं नच वसत ॥
तोंच विदर्भा ठायीं ठायीं टिळकां मिरवीलें ॥
बादशाहि वैभव त्या पुढतीं कःपदार्थ ठरलें ॥
कीर्तन, ज्योतिष, इतिहासातें प्रगतिपथीं नेलें ॥
सर्वगता निजबुद्धिवैभवें, जगता दिपवीलें ॥
स्वातंत्र्याचा सिद्ध-अग्नि जनवेदीं प्रगटविला ॥
पुनरपि आतां विझे न ऐसा नीट धीट केला ॥
॥ चाल ॥ इंग्लंडा टिळक निघाले ॥
कार्य सांवरिलें ॥ येथिचें सगळें ॥
जन सारे बहु कळवळले ॥
जणुं कृष्ण व्रजांतुनि गेले ॥
गोपीसम सद्गद झाले ॥
कोलंबोहुनि परतविती परि छल यास ह्मणावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥ ध्रु० ॥

( २२ )

मवाळ वदती " स्वराज्य युक्ती " देवाचीच दया ॥
विलायतेमाधिं जाऊं रमवूं मनस्तुंग राया ॥
बुद्धिभेद नच व्हावा जनमनिं ह्मणोनि टिळकांनीं ॥
प्रयाण केलें विलायतेसी शिष्टां घेवोनी ॥

९८५१७

तये तिथें मित्रत्व घडविलें मजूर पक्षासी ॥
जनवक्षांतरिं शिरे, झगडतो स्वमान दक्षासि ॥
मंडालेमधिं असतां, कोणी चिरोल ग्रंथ लिही ॥
पापमूल हिंदेंत टिळक हा दुःशब्दा वाही ॥
तयासवें, नच, नोकरशाही–मुखासवें लढण्या ॥
सिद्ध जहाला ब्रिटन-न्याया दांभिक ठरवीण्या ॥
स्वार्थाचा बाजार तिथें हो संरक्षण कसलें ॥
टिळकदेव अपराधी ठरला, जो गीता बोले ॥
पंजाबामधिं नीच डायरें, खाटिककृति केली ॥
अशुद्ध सरितेमाजी वाहुनि भीती परि गेली ॥
नोकरशाही उघड विरोधी भरतभूत झाली ॥
हीनत्वाच्या युगीं अवतरे " गांधी " त्यागबली ॥

चाल ॥ तों बाल परतुनी आला ॥

स्पष्टतर वदला ॥
धरा धैर्याला ॥
आमुचें कार्य आज सरलें ॥
तरुणांचें आतां उरलें ॥
विनयाचे दिन ओसरले ॥

स्वातंत्र्याच्या पवित्रवेदीं बलिदाना द्यावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं, अवधाना द्यावें ॥

( २३ )

अवताराची जणूं समाप्ती येथुनियां झाली ॥

शरीरशक्ती क्षीण जाहली, कृती तीव्र झाली ॥
तरिही केला संगर समर्यीं, स्वार्थाहंकृतिशीं ॥
मानवरूपी देव ज हक्का, धन्य आर्यवंशी ॥
कृतघ्न कोल्हापूर नृपातें दीन करोनीयां ॥
दृष्टि लाविली स्वर्गीं जाण्या वद्‌ती ताप तया ॥
छळछळुनी खिळखिळित जाहली तत्काया-नगरी॥
काळ कां न मग निजभक्षाचें लक्ष्य तयास करी ॥
किती उपायां वैद्यगणांनीं केले पारि व्यर्थ॥
अवाताराची अतां समाप्ती झाली निश्चीत॥
आषाढीच्या कृष्णपक्षिच्या पहिल्या रात्रीस ॥
सोडुनि गेला टाहो फोडित मूर्च्छा ये भूस ॥
॥ चाल ॥ निस्तेज जन बने सारा ॥
जणूं जलधारा ॥
पूर जणू आला ॥
आक्रंदे भूमाता ही॥
काळ कां बाळ मम नेई ॥
चैतन्य हरपलें बाई ॥
शंकित रवि रविवारीं झाला यावें किं न यावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें॥धृ०॥२३॥

( २४ )

अनेक रडले रडतिल पुढती, रडोन रडणार ॥
जरी तुम्हां श्री टिळकप्रिय तरि आह्मि हेंचि वदणार ॥

" जन्मसिद्ध हा स्वातंत्र्याचा हक्क " दिव्य मंत्र ॥
जपुनि आर्यभूमि स्वतंत्र होईल असें करू तंत्र ॥
जरी ह्मणवितां आर्य तरी कां यज्ञासी भीतां ॥
नकोत शस्त्रें ? नको राहुं द्या करा असहकारिता ॥
बाप मरोनि पडलां, रडतां तद्गुण गावोनी ॥
स्त्रिया तुह्मातें तिरस्कारितिल, शूरवीर बनुनी ॥
स्वार्थत्यागें अमित शत्रुतें तुह्मि संहाराल ॥
शीलकवच घ्या असहकारिता कराल करवाल ॥
जो जो अस्सलबीज तयानें शपथेसी घ्यावें ॥
श्री टिळकांच्या कार्यास्तव ज्यां प्राणा अर्पावें ॥

॥ चाल ॥ टिळकांच्या चरणीं हस्त ॥
ठेवुनी वदत ॥ करिन देशहित ॥
भूमातेच्या चरणांस ॥
परम प्रिय जें जीवास ॥
अर्पीन आधिं तें खास ॥

नचकारितां हें रौरव नरकीं पितरांसह जावें ॥
सादर सुंदरवीर गायनीं अवधाना द्यावें ॥ धृ० ॥२४॥

( २५ )

" विनायका "च्या पूर्व स्फूर्तिनें वदलों पोवाडा ॥
मान्य असो ही सेवा सर्वां जयमंगल बोला ॥
देशासाठीं, धर्मासाठीं, मेले आजवरी ॥
धर्मवीर ते, देशवीर ते, यावे अवतारीं ॥

जय जय टिळका, पुण्यश्लोका, धन्य तुझी करणी ॥
असो समाप्ती जयजयकारीं नत प्रणती चरणीं ॥
॥ चाल ॥ जय लोकमान्यकी बोला ॥
हृदयवृत्तिला ॥
देउनी झोला ॥
जय हिंदुमुसलमिन बोला ॥
जय हिंद देविचा बोला ॥ जय गजाननाचा बोला ॥
जय जनतात्मन्, स्वतंत्रतात्मन्, स्वातंत्र्या द्यावें ॥
सादर सुंदर वीरगायनीं अवधाना द्यावें ॥

REFBK-0019514

समाप्त.

क्र. १९५१४

मुद्रक,-रा. अ. बा. घगवे, श्रीसरस्वती मुद्रणालय, बोरभाट लेन,
घ. नं १८ गिरगांव मुंबई.

प्रकाशक-जोगळेकर-जोशी आणि मंडळी,
अ. स. जोशी. आंग्रे यांची, वाडी गिरगांव-ब्याक रोड,-मुंबई.